दैनिक
# महिला संवाद
MAHILA SANVAD

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 250, Marathi Daily Tuesday, Date - 31 March 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २५० वा | मराठी दैनिक | मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

**महिला संवाद**

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

# मिनिटांत खाते रिकामे करणारा आरोपी पकडला

**मुंबई । प्रतिनिधी**

शहरात वरिष्ठ नागरिकांना लक्ष्य करून एटीएम कार्डची अदलाबदली करत फसवणूक करणाऱ्या टोळीविरोधात दिंडोशी पोलिसांनी मोठी आणि नियोजनबद्ध कारवाई करत एका सराईत आरोपीला अटक केली आहे. या कारवाईमुळे मुंबईत घडत असलेल्या अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अटक केलेल्या आरोपीकडून विविध बँकांची तब्बल २५ एटीएम कार्डे, रोख रक्कम आणि दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून, त्याच्या गुन्हेगारी कारवायांचा मोठा जाळा उघडकीस येण्याची शक्यता आहे.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी संभव कुमार कृष्णचंद्र आचार्य (वय ३५) हा ओडिशा राज्यातील रहिवासी असून, तो विशेषतः मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये येऊन गुन्हे करत असे. विमानाने मुंबईत येऊन काही दिवस मुक्काम ठोकत तो शहरातील विविध एटीएम केंद्रांमध्ये फिरत असे. गर्दीची ठिकाणे, कमी सुरक्षा असलेली एटीएम केंद्रे आणि विशेषतः एकटे आलेले किंवा तांत्रिक बाबींमध्ये कमी प्रवीण असलेले वरिष्ठ नागरिक हे त्याचे मुख्य लक्ष्य असे.

आरोपीची कार्यपद्धती अत्यंत चलाख आणि नियोजनबद्ध होती. तो एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी आलेल्या वृद्ध व्यक्तींशी नम्रपणे संवाद साधत असे. मी मदत करतो, मशीन नीट काम करत नाही, पिन टाकण्याची पद्धत चुकीची आहे अशा कारणांवरून तो त्यांच्या जवळ जात असे. काही वेळा तो मुद्दाम एटीएम मशीनमध्ये त्रुटी असल्याचे भासवत असे. मदत करत असल्याचे भासवत असताना तो अत्यंत सफाईने मूळ कार्ड बदलून त्याच्या जवळ असलेले दुसरे कार्ड देत असे. त्यानंतर पीडित व्यक्तीला काहीच कळत नसे आणि आरोपी लगेच तेथून निघून जात असे.

यानंतर काही मिनिटांतच आरोपी संबंधित बँक खात्यातील रक्कम वेगवेगळ्या एटीएममधून काढून घेत असे. अनेकदा तो एकाच दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन पैसे काढत असल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे पोलिसांना त्याचा माग काढणे सुरुवातीला कठीण जात होते.

मालाड पूर्व येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये घडलेल्या घटनेनंतर या प्रकरणाला वेग आला. एका वरिष्ठ नागरिकाची सुमारे ४० हजार



रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार मिळताच दिंडोशी पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे फिरवली. पोलिसांनी अत्याधुनिक तांत्रिक साधनांचा वापर करत परिसरातील ६० ते ७० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज बारकाईने तपासले. आरोपीचे हालचाली, त्याने वापरलेले मार्ग, तसेच एटीएम केंद्रांमधील त्याची उपस्थिती यांचा सखोल अभ्यास करण्यात आला.

तांत्रिक विश्लेषण, कॉल डिटेल्स आणि सीसीटीव्ही फुटेज यांच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा ठावठिकाणा निश्चित केला. अखेर नायगाव पूर्व परिसरात सापळा रचून त्याला अटक करण्यात आली. अटकेदरम्यान आरोपीकडून विविध बँकांची २५ एटीएम कार्डे, रोख रक्कम आणि दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले. या मोबाईल फोनमधून आणखी महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

प्राथमिक चौकशीत आरोपीविरुद्ध मुंबईतील अनेक पोलीस ठाण्यांमध्ये अशाच प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे हा आरोपी एकटाच काम करत होता की एखाद्या मोठ्या टोळीचा भाग आहे, याचा तपास सध्या सुरू आहे. तसेच, त्याने मुंबईबरोबरच इतर शहरांमध्येही अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचाही तपास पोलीस करत आहेत.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नागरिकांना विशेषतः वरिष्ठ नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. एटीएममध्ये अपरिचित व्यक्तींची मदत घेऊ नये, पिन नंबर कोणालाही सांगू नये, कार्ड स्वतः जवळ सुरक्षित ठेवावे आणि संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### शेतकऱ्यांच्या फार्मर आय.डी.वर तहसील कार्यालयाची हलगर्जी



**अलीबाग । प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांपासून वंचित ठेवण्याचे काम तहसीलदार कार्यालय करीत आहे का? गेल्या ८-९ महिन्यांपासून ऑनलाइन आवेदन करूनही हजारो शेतकऱ्यांना 'फार्मर आय.डी.' मिळाले नाही. परिणामी, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवता येत नाही, तर २०२५ च्या नैसर्गिक आपत्ती नुकसानीसाठीही भरपाई मिळवण्यात अडचणी आल्या. महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) शॅडो कैबिनेट सदस्य व जिल्हाध्यक्ष, माहिती अधिकारी संघर्ष समिती देवव्रत विष्णू पाटील यांनी आज (३० मार्च २०२६) तहसीलदार अलिबाग विक्रम पाटील यांना लेखी पत्र देत या प्रकरणात दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची व सर्व शेतकऱ्यांना तात्काळ ओळखपत्र वितरण करण्याची मागणी केली आहे.

देवव्रत पाटील यांनी सांगितले की, अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांनी ऑनलाइन प्रक्रियेद्वारे 'फार्मर आय. डी.'साठी अर्ज केले असली तरी तहसीलदार कार्यालयाकडून प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. यामुळे शेतकऱ्यांना शासकीय अनुदान, विमा, नुकसान भरपाईसह इतर लाभ मिळवता येत नाहीत. विशेषत: २०२५ मध्ये पावसाळ्यात झालेल्या नुकसानीसाठी ज्या शेतकऱ्यांना भरपाई मिळणार होती, त्यांना 'फार्मर आय.डी.' नसल्याने अतिरिक्त कागदपत्रांची पूर्तता करावी लागली. तलाठी व तहसीलदार कार्यालयांना अनेकदा भेटी देऊनही ओळखपत्र मिळाले नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना शारीरिक-मानसिक त्रास सहन करावा लागला व आर्थिक नुकसान झाले.हलगर्जीपणाला परवानगी नाही!महाराष्ट्र नवनिर्माण सेना नेहमीप्रमाणे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढते.

देवव्रत पाटील म्हणाले, तहसीलदार कार्यालयातील हलगर्जीपणा शेतकऱ्यांच्या खायच्या पायी पाणी पाडतोय. कामात दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी. तात्काळ सर्व प्रक्रिया पूर्ण करून प्रत्येक शेतकऱ्याला 'फार्मर आय.डी.' द्यावे, अन्यथा मनसे आंदोलन छेडेल! माहिती अधिकार संघर्ष समितीमार्फतही हे पत्र देण्यात आले असून, शासनाने या प्रकरणाला गंभीरतेने घ्यावे, अशी मागणी देवव्रत पाटील यांनी केली आहे.अलिबाग तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात या प्रकरणाने त्रस्त आहेत. तहसीलदार कार्यालयाने आता तरी झोपेच्या गोळ्यांपासून सावध होऊन कारवाई करावी, अन्यथा शेतकऱ्यांचा रोष वाढेल!

# वडेट्टीवारांचा स्फोटक दावा; भोंदूबाबा खरातचे मंत्रालयातील अधिकाऱ्यांशी लागेबांधे

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरात याचे मंत्रालयातील अधिकाऱ्यांसोबत लागेबांधे होते. तो या बड्या अधिकाऱ्यांना एकमेकांच्या फॅमिली शेअर करायला सांगायचा, असा स्फोटक दावा काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. राज्य सरकार या अधिकाऱ्यांवर कारवाई करत नाही कारण त्यांना भीती वाटते, असेही वडेट्टीवार यांनी म्हटले. ते सोमवारी नागपूरमध्ये 'एबीपी माझा'शी बोलत होते.

अशोक खरात याच्या मोबाईलमध्ये सांकेतिक भाषेत कोडवर्डमध्ये काही नेत्यांची नावं लिहली आहे. कारण खरात अनेकांचे काळे पैसे पांढरे करायचं काम करत होते. मात्र, त्याने काही फरक पडत नाही. जे या कृत्यात सहभागी आहे त्या सर्वांची चौकशी करायला पाहिजे. फक्त रुपाली चाकणकर यांना समन्स देऊन चालणार नाही, तर ज्या ज्या ४९ आमदारांचे फोटो अशोक खरात सोबत आहे, त्या सगळ्यांची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली.

अनेक सरकारी अधिकारी आपल्या पत्नीला आणि कुटुंबीयांना घेऊन अशोक खरात याच्याकडे जात होते. जे पती आपल्या पत्नीला खरात कडे पाठवत होते, ते पती पण तितकेच दोषी आहे. त्यांची पण चौकशी करून अंधश्रद्धा निर्मूलन कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल व्हायला पाहिजेत, असे वडेट्टीवार यांनी म्हटले.



अनेकांच्या मोठमोठ्या लोकांच्या बायका अशोक खरात याच्या ऑफिसमध्ये जात होत्या. त्यांचे नवरे बाहेर बसून राहायचे. हे अधिकारी भोंदूगिरीला, अंधश्रद्धेला समर्थन द्यायचे. बाकी आतमध्ये काय झाले, याबद्दल मी बोलणार नाही, त्याचे पुरावे माझ्याकडे नाहीत. सध्या समोर येणारे व्हिडीओ सिलेक्टेड आहेत. अशोक खरातच्या ऑफिसमध्ये सापडलेल्या पेनड्राईव्हमध्ये १००० व्हिडीओ आहेत, पण त्यापैकी फक्त १५० व्हिडीओ समोर आले आहेत. ज्या महिलांवर लैंगिक अत्याचार झाला त्यांच्या नवऱ्यावर कारवाई केली पाहिजे.

अशोक खरात हा अनेक वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना एकमेकांच्या बायका शेअर करायला सांगायचा. हे किती घाणेरडं आणि महाराष्ट्राची इभ्रत काढणारं प्रकरण आहे. तरीही राज्यकर्त्यांना थोडीही लाज वाटत नाही, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

**जाहिर प्रगटन**

फक्त 300 रुपयात

दैनिक महिला संवाद मध्ये छोट्या जाहिराती आणि पॅनल जाहिराती अगदी स्वस्तात छापून मिळतील.

जाहीर प्रगटन, पाहिजेत, जन्मतारीख बदल, नावात बदल, मालमत्ता हस्तांतरण, खरेदी-विक्री व स्वरूपाच्या यासहित छोट्या

जाहिराती केवळ 300 रुपयात प्रसिध्द केल्या जातील..

इच्छुकांनी आजच या नंबरवर संपर्क साधावा.

9168567111

# बुरख्याच्या आड बनावट सह्या; भावाचा बहिणीवर डाव उघड



**बीड । प्रतिनिधी**

रक्ताच्या नात्याला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना बीड जिल्ह्यात समोर आली आहे. स्वतःच्या सख्ख्या बहिणीची फसवणूक करण्यासाठी एका भावाने चक्क आपल्या पत्नीलाच बहिणीच्या रूपात उभे केले. त्याने बुरख्याचा आधार घेत नोंदणी कार्यालयात बनावट हक्कसोडपत्र तयार केले. त्यानंतर बहिणीच्या वाट्याची जमीन हडपल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर आता या पती-पत्नीविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रजिया बानो या बीड तालुक्यातील माळीपुरा येथील रहिवासी आहेत. त्यांनी नुकतंच याप्रकरणी न्यायालयात दाद मागितली होती. रजिया यांचे वडील आणि आईच्या निधनानंतर त्यांच्या मालकीची शेतजमीन सर्व वारसांमध्ये विभागली गेली होती.

यानंतर ७/१२ उताऱ्यावर चार बहिणी आणि एक भाऊ अशा सर्वांची नावे कायदेशीररित्या नोंदवण्यात आली होती. नियमानुसार प्रत्येकाला आपल्या वाट्याचा हिस्सा मिळाला होता. मात्र आरोपी भाऊ आबेद खान याला संपूर्ण जमीन स्वतःच्या नावावर करायची होती. त्यासाठी त्याने २४ ऑक्टोबर २०२४ रोजी एक डाव रचला.

त्याने दुय्यम निबंधक कार्यालय (रजिस्ट्री ऑफिस), बीड येथे आपल्या पत्नीला, वाहिदा हिला सोबत नेले. वाहिदाने बुरखा परिधान केला होता. ज्यामुळे तिची ओळख पटवणे कठीण झाले. आबेदने निबंधक कार्यालयात आपली पत्नी हीच रजिया बानो ही बहीण असल्याचे भासवले. यानंतर बुरख्याच्या आड वाहिदाने रजिया यांच्या नावाच्या बनावट सह्या केल्या. यानंतर जमिनीचे हक्कसोडपत्र आबेदच्या नावे करून दिले.

हा सर्व फसवणुकीचा प्रकार रजिया बानो यांच्या लक्षात आला. त्यानंतर त्यांनी सुरुवातीला पोलिसांत धाव घेतली. मात्र, तिथे योग्य दखल घेतली गेली नाही. त्यानंतर त्यांनी याप्रकरणी अखेर न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणातील गांभीर्य आणि पुराव्यांची पडताळणी केल्यानंतर न्यायालयाने पोलिसांना तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार आबेद खान आणि त्याची पत्नी वाहिदा यांच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी विविध कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे.

या घटनेमुळे बीड परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. तसेच या घटनेमुळे सरकारी कार्यालयातील ओळख पटवण्याच्या प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. पोलीस आता या प्रकरणातील साक्षीदार आणि निबंधक कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याची शक्यता आहे.



## संपादकीय...

### एटीएममध्ये वाढते गुन्हे

मुंबईसारख्या अत्याधुनिक आणि सतत जागी असलेल्या शहरातही फसवणुकीचे नवे-नवे प्रकार समोर येत आहेत, ही चिंताजनक बाब आहे. विशेषतः वरिष्ठ नागरिकांना लक्ष्य करून एटीएम कार्डची अदलाबदली करत पैसे लंपास करणाऱ्या प्रकाराने केवळ आर्थिक फसवणूकच नव्हे, तर समाजातील विश्वासाच्या नात्यालाही तडा दिला आहे. दिंडोशी पोलिसांनी केलेली कारवाई कौतुकास्पद असली तरी, अशा गुन्ह्यांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी व्यापक पातळीवर उपाययोजना आवश्यक आहेत. या प्रकरणातील आरोपीने वापरलेली पद्धत ही अत्यंत धोकादायक आणि विचारपूर्वक आखलेली आहे. 'मदत' या साध्या आणि मानवी भावनेचा गैरफायदा घेत तो वृद्ध नागरिकांना जाळ्यात ओढत होता. तांत्रिक बाबींमध्ये कमी प्रवीण असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना एटीएम मशीन वापरताना येणाऱ्या अडचणींचा फायदा घेत त्याने विश्वास संपादन केला आणि क्षणात फसवणूक केली. ही केवळ एका व्यक्तीची चलाखी नसून, समाजातील संवेदनशील घटकांवर लक्ष ठेवून गुन्हे घडवले जात असल्याचे संकेत यातून मिळतात. आजच्या डिजिटल युगात बँकिंग सेवा अधिक सोप्या झाल्या असल्या तरी, त्याचबरोबर सायबर आणि प्रत्यक्ष फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत. एटीएम, ऑनलाइन व्यवहार, यूपीआय यांसारख्या माध्यमांचा वापर करताना सतर्कता ही अत्यावश्यक झाली आहे. मात्र, प्रत्येक नागरिकाला तितकी तांत्रिक माहिती असेलच असे नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत बँका आणि प्रशासनाने केवळ सुविधा देण्यापेक्षा सुरक्षेची जबाबदारीही तितक्याच गांभीर्याने पार पाडली पाहिजे. या घटनेतून काही मूलभूत प्रश्न समोर येतात. एटीएम केंद्रांमध्ये पुरेशी सुरक्षा व्यवस्था आहे का? सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत का? सुरक्षा रक्षकांची नियुक्ती प्रभावीपणे केली जाते का? विशेषतः ज्याठिकाणी वृद्ध नागरिकांची वर्दळ अधिक असते, तेथे मार्गदर्शनासाठी अधिकृत कर्मचारी का उपलब्ध नसतात? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आणि त्यानुसार धोरणात्मक बदल करणे ही काळाची गरज आहे.

# ठाणे जिल्ह्याचा डिजिटल कायापालट

## डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नेतृत्वाखालील लोकाभिमुख प्रशासनाचा नवा अध्याय

ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने नागरीकरण होणारा आणि औद्योगिकदृष्ट्या संपन्न जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र, विस्तारलेल्या भौगोलिक सीमा आणि वाढत्या लोकसंख्येमुळे शासकीय सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे मोठे आव्हान होते. हे आव्हान स्वीकारून जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी 'ई-गव्हर्नन्स सुधारणा अभियानांतर्गत' राबवलेल्या अभिनव उपक्रमांमुळे ठाणे जिल्हा आज डिजिटल प्रशासनाचे एक प्रेरणादायी मॉडेल म्हणून उदयास आला आहे.

**प्रशासकीय पारदर्शकतेचा नवा कणा: सेवा संवाद आणि डिजी संवाद**

नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या मारण्यापासून मुक्ती मिळावी, यासाठी प्रशासनाने तंत्रज्ञानाचा चपखल वापर केला आहे. 'सेवा संवाद' या १५ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झालेल्या उपक्रमामुळे जिल्ह्यातील ८७३ 'आपले सरकार' सेवा केंद्रांच्या कामकाजात मोठी सुधारणा झाली आहे. प्रत्येक केंद्रावर उपलब्ध असलेल्या टठ-उेवश मुळे नागरिकांना मिळालेल्या सेवेचा दर्जा, दरपत्रकाची अचूकता आणि केंद्र चालकाचे वर्तन यावर थेट ऑनलाईन अभिप्राय देण्याची संधी मिळाली आहे. या रेटिंग प्रणालीमुळे केंद्र चालकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण झाली असून अनावश्यक शुल्कावरही नियंत्रण आले आहे.

तक्रार निवारण ही प्रशासनाची सर्वात महत्त्वाची चाचणी असते. डॉ. पांचाळ यांनी 'डिजी संवाद' या Whats-pp आधारित (९९३०००११८५) उपक्रमाद्वारे नागरिकांसाठी २४७ तक्रार नोंदणीची सोय उपलब्ध करून दिली आहे. कार्यालयात न जाताही केवळ एका मेसेजद्वारे तक्रार नोंदवणे आणि तिचे डिजिटल ट्रॅकिंग करणे शक्य झाल्यामुळे प्रशासन अधिक प्रतिसादक्षम बनले आहे.

ऐतिहासिक वारशाचे जतन आणि भू-व्यवस्थापनात क्रांती: ई-संजीवन व राजभूमी..

प्रशासनाने केवळ दैनंदिन कामातच नव्हे, तर ऐतिहासिक अभिलेखांच्या जतनासाठीही दूरदृष्टी दाखवली आहे. 'ई-संजीवन' प्रणालीद्वारे सन १८९० पासूनची जन्म-मृत्यू नोंदणी रजिस्टर (कोतवाल रजिस्टर) -ख आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षित केली आहेत. यामुळे शंभर वर्षांपूर्वीच्या नोंदी काही क्षणात मिळवणे शक्य झाले आहे, जे पूर्वी अत्यंत जिकिरीचे काम होते.

तसेच, 'राजभूमी' पोर्टलच्या माध्यमातून शासकीय जमिनींचे डिजिटल व्यवस्थापन सुरू करून प्रशासनाने भू-माफियांना मोठा धक्का दिला आहे. अक्षांश-रेखांश आणि जिओ-रेफरन्सिंगमुळे शासकीय जमिनींचे अचूक क्षेत्र निश्चित झाले असून, 'लँड बँक' सुविधेमुळे विकास प्रकल्पांसाठी जागा निवडणे सुलभ झाले आहे. या पोर्टलवर उपलब्ध असलेल्या 'डीशशीं तळशु' आणि विविध ऋखड लेयर्समुळे अतिक्रमण शोधणे आणि जमिनींचे संरक्षण करणे आता अत्यंत सोपे झाले आहे.



**आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांचे डिजिटल जाळे..**

डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याने सामाजिक क्षेत्रातील सेवांचेही डिजिटल मॅपिंग केले आहे. जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे (झकउ), शासकीय शाळा आणि ग्रामीण रुग्णालये यांची माहिती नकाशावर उपलब्ध केल्यामुळे सामान्य नागरिकांना या सेवा शोधणे सोपे झाले आहे. मुख्य रस्त्यांचे जाळे, ड्रेनेज व्यवस्था आणि आपत्कालीन सेवांची माहिती एकाच क्लिकवर उपलब्ध असल्यामुळे भविष्यातील आपत्ती व्यवस्थापन आणि पूरनियोजन अधिक शास्त्रोक्त पद्धतीने करणे शक्य झाले आहे.

अतिदुर्गम शहापूर-मुरबाडपासून ते गजबजलेल्या ठाणे-कल्याणपर्यंतच्या प्रत्येक नागरिकाचा वेळ, पैसा आणि श्रम वाचवण्याचे हे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सुलभता आणल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन..! त्यांनी राबवलेले हे ई-गव्हर्नन्स उपक्रम केवळ तांत्रिक बदल नसून प्रशासनाच्या कार्यपद्धतीतील मूलभूत परिवर्तन आहेत.

'१५० दिवसांच्या ई- गव्हर्नन्स सुधारणा' कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या उत्कृष्ट कार्यालयांना तसेच सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या उत्कृष्ट कार्यालयप्रमुखांना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज सन्मानित करण्यात आले. यात ठाणे जिल्हा प्रशासनातील जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, पोलीस अधीक्षक डॉ.डी.स्वामी, नवी मुंबई महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांना आज मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते गौरविण्यात आले. ही बाब ठाणे जिल्हा प्रशासनातील प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यासाठी आणि समस्त ठाणेकरांसाठी प्रेरणादायी आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**

## नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापन यावर भर देत जमाबंदी आयुक्त विभागाची डिजिटल क्रांतीकडे झेप

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत जमाबंदी आयुक्त व भूमी अभिलेख संचालनालयाने (डीएलआर) डिजिटल युगाशी सुसंगत अशी व्यापक आणि प्रभावी कामगिरी नोंदवली आहे. नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापन यावर भर देत विभागाने राज्यातील जमीन नोंद प्रणाली अधिक सुलभ, वेगवान आणि विश्वासार्ह केली आहे. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच सर्वोत्तम आयुक्त / संचालक गटातील ६८ सहभागींपैकी दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करुन जमाबंदी आयुक्त कार्यालयाला गौरविण्यात आले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तत्कालीन जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे यांच्या कार्यकाळात ही उल्लेखनीय कामगिरी झाली आहे.

'महाभूमी'च्या माध्यमातून १०० टक्के ऑनलाइन सेवा

राज्यातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मपैकी 'महाभूमी' पोर्टल हे एक असून, सात बारा उतारा, ८अ उतारा, प्रॉपर्टी कार्ड, फेरफार नोंदी यांसारख्या सेवा आता १०० टक्के ऑनलाइन उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या सेवांना १.८ अब्जांहून अधिक हिट्स मिळाल्यामुळे नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद आणि विश्वास स्पष्ट झाला आहे.

फाईलचा निपटारा तीन दिवसात

ई-ऑफिस प्रणालीची राज्यभर मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्यात येत असून ४३० हून अधिक कार्यालयांमध्ये ८२ टक्के अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. फाईल निपटारा दर ९३ टक्क्यांपर्यंत पोहोचला असून सरासरी तीन दिवसांत कामे पूर्ण होत आहेत. यामुळे प्रशासनातील कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढली आहे.

डिजिटल प्रणालीचा प्रभावी वापर

नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्यासाठी प्रभावी 'ग्रिव्हन्स रिड्रेसल' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. एसएमएसद्वारे अभिप्राय, दोन स्तरांवरील अपिल यंत्रणा आणि कालबद्ध सेवा वितरणामुळे उत्तरदायित्व अधिक मजबूत झाले आहे. तसेच ४,५०० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन डिजिटल प्रणालींचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यात आला आहे.

सर्व जमीन संबंधित सेवा एका प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न

नवोन्मेषाच्या दृष्टीने विभागाने 'भूमित्र' चॅटबॉट, व्हॉट्सपद्वारे सेवा, तसेच जीआयएस आधारित ई-मोजणी २.० सारख्या अत्याधुनिक प्रणाली विकसित केल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने मोजणी प्रक्रिया जलद आणि अचूक करण्यात आली असून, ६३५ प्रकरणे एआयद्वारे सोडवण्यात आली आहेत. तसेच 'लँड डॅशबोर्ड'च्या माध्यमातून राज्य, विभाग, जिल्हा ते गाव पातळीपर्यंतच्या माहितीचे विश्लेषण, डेटा व्हिज्युअलायझेशन आणि निर्णय प्रक्रियेसाठी उपयुक्त साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनातून एकसंध 'युनिफाइड लँड मॅनेजमेंट सिस्टीम' (युएलएमएस) विकसित करण्याचेही काम सुरू असून, सर्व जमीन संबंधित सेवा एका प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न आहे. एकूणच, जमाबंदी आयुक्त कार्यालयाने १५० दिवसांच्या कार्यक्रमात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासनाचे आदर्श उदाहरण निर्माण केले आहे.

## उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र शासन पुरस्कृत, 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमाची २०२२ ते २७ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असाक्षरांना साक्षर करण्यासाठी अंमलबजावणी केली जात आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ मध्ये उल्लास पवर नोंदणी झालेल्या असाक्षरांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा रविवार दि. २९ मार्च २०२६ रोजी राज्यात घेण्यात आली.



मराठी, हिंदी, इंग्रजी, ऊर्दू, गुजराती, कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली या नऊ माध्यमातून घेण्यात आलेल्या या परीक्षेतून निकषानुसार परीक्षार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडून नवसाक्षरांना प्रमाणपत्र व गुणपत्रक एकत्रित देण्यात येणार आहेत. या चाचणीच्या माध्यमातून व्यक्तीच्या जीवनामध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरुकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण ही जीवन कौशल्ये विकसित होण्यास मदत होणार आहे. तसेच त्या अनुषंगाने त्यांचे पुढील जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

मागील वर्षी २१ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या परीक्षेत सुमारे पाच लाख असाक्षरांनी सदर परीक्षा दिली होती. तर केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार राज्यात नव्याने नोंदणी केलेल्या सुमारे १.२३ लाख इतक्या असाक्षर व्यक्तींपैकी सुमारे एक लाख असाक्षर व्यक्तींनी चाचणी परीक्षा दिली.

या परीक्षेच्या निमित्ताने शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त यांनी असाक्षरांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. 'जिल्हा परीक्षा निरीक्षक' म्हणून सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्यस्तरावरील सर्व शिक्षण संचालक, सहसंचालक, उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांच्यासह संबंधित यंत्रणांच्या प्रमुखांनी भेट देऊन परीक्षांचे निरीक्षण केले तसेच परीक्षा घेणाऱ्या यंत्रणांना आणि परीक्षार्थींना प्रोत्साहन दिले. यानिमित्ताने असाक्षरांना प्रोत्साहन देणाऱ्या सर्व यंत्रणांचे शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांनी आभार व्यक्त केले.

# मोठ्या प्रमाणात संधी मिळाल्याने आदिवासी समाज नव्या तेजाने उभा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

'आदिवासी बांधवांना शिक्षण, रोजगाराच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे हा समाज आता नव्या तेजाने उभा राहिला असून आता हा समाज मागे वळून पाहणार नाही', असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला. मायाताई इवनाते यांनी संधीचे सोने करून समाजाच्या कायम स्मरणात राहील असे कार्य करावे, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले.

मायाताई चिंतामणराव इवनाते सत्कार समितीच्या वतीने राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार मायाताई इवनाते यांचा नागरी सत्कार करण्यात आला. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित या सत्कार सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आमदार कृष्णा खोपडे, माजी आमदार देवराव होळी, माजी आमदार सुधाकरराव देशमुख, महापौर नीता ठाकरे यांची प्रामुख्याने उपस्थित होती.

नागपूर, दि. २९:- 'आदिवासी बांधवांना शिक्षण, रोजगाराच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे हा समाज आता नव्या तेजाने उभा राहिला असून आता हा समाज मागे वळून पाहणार नाही', असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला. मायाताई इवनाते यांनी संधीचे सोने करून समाजाच्या कायम स्मरणात राहील असे कार्य करावे, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले.

मायाताई चिंतामणराव इवनाते सत्कार समितीच्या वतीने राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार मायाताई इवनाते यांचा नागरी सत्कार करण्यात आला. डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित या सत्कार सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आमदार कृष्णा खोपडे, माजी आमदार देवराव होळी, माजी आमदार सुधाकरराव देशमुख, महापौर नीता ठाकरे यांची प्रामुख्याने उपस्थित होती.

राज्यात आदिवासी बांधवांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी व्यापक स्तरावर काम होत आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणाची सोय होत आहे. त्यांच्या परदेशातील शिक्षणासाठीही शासनाने तरतुदी केल्या आहेत. संधी मिळाली तर आदिवासी मुले संधीचे सोने करतात, हे त्यांनी आपल्या विविध कौशल्यांच्या माध्यमातून दाखवून दिले आहे. कुपोषण मुक्तीच्या कार्यात महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.



समाजात ज्ञानाचा प्रसार होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती होते. आदिवासी समाजाची परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. संपूर्ण समाज विकासाच्या या यात्रेत सहभागी होईल, तेव्हा त्या समाजाला दिशा देण्याचे कार्य मायाताईंसारख्या नेतृत्वाला करावे लागेल. समाज आज त्यांच्याकडे अत्यंत आशेने पाहतो आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना केले.

मायाताईंचे जीवन अत्यंत कठीण परिस्थितीत आणि संघर्षात गेले असा उल्लेख करुन श्री. गडकरी म्हणाले, त्यांच्याकडे आलेल्या प्रत्येक जबाबदारीचा वापर त्यांनी सामाजाच्या कल्याणासाठी केला आहे. त्यांच्या नेतृत्वात समाज आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीकडे वाटचाल करेल, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

हा सन्मान माझ्या समस्त आदिवासी बांधवांचा - मायाताई इवनाते

आदिवासी समाजाचे दुःख आपण जवळून पाहिले आहे. समाजासाठी बरेच काही करायचे आहे. संसदेत त्यांची प्रतिनिधी या नात्याने त्यांचे प्रश्न मांडायचे आहेत. देश बदलत असताना या बदलांमध्ये माझ्या आदिवासी बांधवांचा मोठा वाटा असेल, अशा भावना मायाताई इवनाते यांनी सत्कारास उत्तर देताना व्यक्त केल्या.

याप्रसंगी आदिवासी विकास युवा संघ, ट्रायबल इन्स्टिट्यूट अँड मल्टीपर्पज एज्युकेशन सोसायटी, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, संयुक्त आदिवासी कृती समिती, आदिवासी उडान बहुउ्ददेशीय संस्था, इंडिजिनिअस ट्रायबल वुमेन फोरम या संघटनांसह इतर विविध संघटनांच्या वतीने मायाताई इवनाते यांचा सत्कार करण्यात आला. या संघटनांचे पदाधिकारी आकाश मडावी, महेंद्र उईके, राजेंद्र मरस्कोल्हे, विवेक नागभिरे, प्रशांत कुमरे, विनोद मसराम, दिनेश शेराम, सदाराम गाते, आशा तुमडाम यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी बांधवांची कार्यक्रमाला उपस्थिती होती. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्यामल देशमुख यांनी या कार्यक्रमाचे संचालन केले. महेंद्र उईके यांनी आभार मानले.

## थोडक्यात

### इरई धरण परिसरात कासव शिजवताना दोघांवर कारवाई;

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मोहर्ली वनपरिक्षेत्र अंतर्गत इरई धरण परिसरात संरक्षित कासव पकडून त्याचे मांस शिजवताना दोन जणांना वन विभागाने रंगेहाथ पकडले असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

ही घटना दि. २८ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे साडेअकराच्या सुमारास सितारामपेठ बिटातील मौजा भामडेळी येथील मच्छीघाट परिसरात उघडकीस आली. आरोपी ज्योती शैलेश घंटसाल व शैलेश सोमनाद्री घंटसाल, दोघेही आंध्रप्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील कैकलूरु येथील रहिवासी असून त्यांनी संरक्षित कासव पकडून त्याचे मांस शिजवून खात असल्याचे आढळून आले.

वनरक्षक सुरेंद्र मंगाम आणि क्षेत्र सहाय्यक संजय जुमडे यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे घटनास्थळी धाड टाकली. यावेळी दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून कासवाचे अवशेषही जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणी वनगुन्हा क्रमांक ०९६४३/२४१०५६ अन्वये वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ मधील संबंधित कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कायद्यानुसार संरक्षित वन्यजीवांची शिकार करणे, त्यांना इजा करणे किंवा त्यांचे अवयव बाळगणे हा गंभीर आणि दंडनीय गुन्हा आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास उपसंचालक कुशाग्र पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे करीत आहेत. आरोपींविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार असल्याचे वन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, वन विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, संरक्षित वन्यजीवांचे संरक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांची माहिती तात्काळ वन विभागाला द्यावी, जेणेकरून वन्यजीवांचे संवर्धन आणि संरक्षण प्रभावीपणे करता येईल.

### लोकसहभागातून गुरुपिंपरी शिवार पाणीदार करण्याचा निर्धार; नाला कामांना सुरुवात

**घनसावंगी । प्रतिनिधी**

गुरुपिंपरी शिवारात जलसंधारणाला चालना देण्यासाठी लोकसहभागातून नाला खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामांना उत्साहात प्रारंभ करण्यात आला. तहसीलदार रमेश पागोटे यांच्या हस्ते पोकलेन मशीनचे पूजन करून नारळ फोडत या उपक्रमाचा शुभारंभ झाला. यावेळी समस्त महाजन ट्रस्ट, मुंबईच्या विश्वस्त श्रीमती नूतन दीदी देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला. योगेश कोल्हे, तुकाराम कोल्हे, नेताजी कोल्हे, कैलास कोल्हे, कृष्णा कोल्हे, रामेश्वर कोल्हे, दत्तात्रय कोल्हे, कृष्णा थोरात, बापूसाहेब कोल्हे, विकास कोल्हे, संतोष कोल्हे, विनोद खंडागळे, दिगंबर उगले, तसेच राजेगाव येथील वैभव टरले, प्रवीण टरले, गजानन उगले, नारायणभाऊ देवकते, महादेव मते, गणेश अरविंद नाईकनवरे, नरेंद्र जोगड, वैभवी तरळ व अमर अवघड यांचा सहभाग होता.

यावेळी तहसीलदार रमेश पागोटे यांनी शेतकऱ्यांच्या एकजुटीचे कौतुक करत, गावकऱ्यांनी पुढाकार घेतल्यास शिवार पाणीदार होणे शक्य आहे. जलसंधारणाच्या कामांमुळे शेतीला दीर्घकालीन फायदा होईल, असे सांगितले. तसेच सामाजिक ट्रस्टकडून मिळालेल्या यंत्रसामग्रीचा योग्य वापर करून कामे अखंड सुरू ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.

नारायण देवकते यांनी कामाची सविस्तर माहिती देत नाल्याच्या खोलीकरण व रुंदीकरणामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवा चित्राल यांनी केले. शेवटी श्रीमती नूतन दीदी देसाई यांनी सर्वांना शुभेच्छा देत आभार मानले.

या उपक्रमामुळे गुरुपिंपरी परिसरात पाण्याची उपलब्धता वाढून शेती अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# खरात प्रकरण तापलं; नीलम गोऱ्हेंवर तृप्ती देसाईंचा थेट आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांच्या लैंगिक शोषणाचा, त्यांच्यावर अत्याचार केल्याचा आरोप असलेल्या भोंदू अशोख खरात प्रकरणाची व्याप्ती वाढतच चालली असून या केसमुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. अनेक राजकारणी, नेते, सेलिब्रिटी हे खरातला भेटायला यायचे अशी माहितीदेखील समोर आली होती. यामध्ये रुपाली चाकणकर, दीपक केसरकर यांचं नाव आत्तापर्यंत अनेकवेळा समोर आलं असून चाकणकरांना तर राज्य महिला आयोगाचं अध्यक्षपद आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा द्यावा लागला. आता याप्रकरणात एक नवी अपडेट समोर आली असून सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी विधानपरिषदेच्या उपसभापती, शिवेसान (शिंदे गट) नेत्या नीलम गोऱ्हे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

नीलम गोऱ्हे या अशोक खरातला गेल्या अनेक वर्षांपासून ओळखत आहेत. कोरोनापूर्वी त्यांनी खरातची भेट घेतली होती. एवढंच नव्हे तर खरातने नीलम गोऱ्हेंचं भविष्य सांगितलं होतं, आमदारकीसाठी गोऱ्हे या खरातल्या भेटल्या असा आरोप देसाई यांनी केला आहे. कदाचित गोऱ्हे यांना खरातच्या काळ्या कारवायांची माहिती नसेल, पण आता अनेक महिलांनी खरातची गैरकृत्य सांगितल्यानंतर, गोऱ्हे यांनी खरातविरोधात आवाज का उठवला नाही?, आपल्या भेटीची माहिती त्यांनी का दिली नाही?, असा सवालही देसाई यांनी विचारला.

मंत्रीपद मिळावं, ते भविष्य बघण्यासाठीसुद्धा कॉलेजरोडच्या खरातच्या ऑफीसमध्ये नीलम गोऱ्हे या पोहोचलेल्या होत्या. नाशिकमध्ये पाथर्डी फाट्याला एक्स्प्रेस इन नावाचं जे हॉटेल आहे , (कोरोनाच्या काळाच्या आधी) तिथे नीलम गोऱ्हे मुक्कामाला होत्या. त्यावेळी अशोक खरात हा एक्स्प्रेस इन हॉटेलमध्ये नीलम गोऱ्हे यांना त्यांचं भविष्य सांगण्यासाठी भेटायला गेलेला होता. हे प्रकरण बाहेर आल्यापासून अनेक जण या प्रकरणात बोलत नव्हते, त्यात सर्वात महत्वाचा चेहरा होता तो नीलमताई गोऱ्हेंचा. कारण नीलम गोऱ्हेंना आपण पाहिलं आहे, अगदी छोटी प्रकरणी असली तरी त्याबद्दल प्रेस नोट काढण, त्यावर जाहीरपणे त्या बोलत असता. पण आता अख्खं अधिवशेन झालं,



तिथे त्या उपसभापती म्हणून आहेत. महिलांच्या लैंगिक शोषणा मुद्दा आला की नीलमताई या पाडितेला भेटायला जातात. पण इथे १५० हून अधिक व्हिडीओ पोलिसांकडे आले, मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची दखल घेतली, तेजस्वीनी सातपुते या महिला अधिकारी या प्रकरणाचा तपास करत आहेत. तरीही एक महिला नेतच्या म्हणून, जबाबदारीचं पद (विधानपरिषदेच्या उपसभापती) आहे, या खरात प्रकरणात नीलम गोऱ्हे आत्तापर्यंत काहीच बोलल्या नाहीत, ते का असा सवाल तृप्तची देसाई यांनी विचारला.

नीलम गोऱ्हेंसोबतच्या व्यक्तीनेच दिली माहिती

याचं कारण म्हणजे अशोक खरातचं संबंध हा नीलम गोऱ्हे यांच्याशी आहे. नीलम गोऱ्हे या खरातला भविष्य दाखवायला जायच्या. ज्या भेटी मी सांगितल्या, त्या भेटींमध्ये नीलम गोऱ्हे यांच्यासोबत जी व्यक्ती तिथे उपस्थित होती, त्यांनीच मला ही माहिती पुण्यामध्ये येऊन दिली आहे, असा मोठा खुलासा तृप्ती देसाई यांनी केला.

नीलम गोऱ्हे या स्पष्टवक्त्या आहेत, जेव्हा हे प्रकरण बाहेर आलं, तेव्हा त्यांनी हे सगळं सांगायला हवं होतं, यासंदर्भात आवाज उठवायला हवा होता. अशोक खरात जरी त्यांच्या परिचयाचा असला तरी या प्रकरणात आता मी आवजा उठवणार अशी भूमिका नीलम गोऱ्हे यांची असायला हवी होती असंही तृप्ती देसाई म्हणाल्या. सगळं समोर आल्यावरही नीलम ताई शांत बसलेल्या आहेत, आम्हाला तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती, अशी टीकाही देसाई यांनी केली.

# पीएनजीकडे वळा, नाहीतर एलपीजीला रामराम; भुजबळांचा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

आखातात सुरू झालेल्या युद्धामुळे भारत देश चांगलाच होरपळत आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात उर्जासंकट निर्माण झाले आहे. नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलाची भारतात मोठी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळेच गॅस सिलिंडरची किंमत वाढली आहे. गॅस बुक करूनही लोकांना वेळेवर गॅस सिलिंडर मिळत नाहीये. लोकांना कित्येक तास रांगेत उभे राहावे लागतेय. त्यामुळेच आता महाराष्ट्रात ज्या ठिकाणी पीएनजी कनेक्शन घेणे शक्य आहे, तिथे लवकरात लवकर अर्ज करा. घरात पीएनजी कनेक्शन लावून घ्या, असे आवाहन केंद्र तसेच राज्यातील सरकारकडून केले जात आहे. पीएनजी कनेक्शन लवकरात लवकर दिले जावे यासाठी नियम आणि अटी शिथील करण्यात आल्या आहेत. दरम्यान, याच पीएनजी कनेक्शनबाबत बोलताना अण्ण व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी मोठी आणि महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांनी तुमचे गॅस सिलिंडर मिळण्याचे कनेक्शन बंद होऊ शकते, असे सांगितले आहे.



ज्या ज्या ठिकाणी पीएनजी कनेक्शन घेणे शक्य आहे, त्या ठिकाणी लवकरात लवकर अर्ज करा, असे आवाहन भुजबळ यांनी केले आहे. तसेच ज्या भागात पीएनजीची व्यवस्था आहे, तिथे पीएनजी कनेक्सनसाठी तीन महिन्यांच्या आत अर्ज करणे गरजेचे आहे. घरगुती असो किंवा व्यावसायिक उद्देशासाठी असो तुमच्या भागात पीएनजीची सुविधा असेल तर त्यांनी तसे कनेक्शन मिळावे यासाठी अर्ज करावा. पीएनजीच्या कनेक्शनसाठी अनेक कंपन्या कार्यरत आहेत. त्यांना राज्यातील वेगवेगळे भाग वाटून दिलेले आहेत, असे भुजबळ यांनी सांगितले.

तसेच, पीएनजीसाठी अर्ज कुठे करावा हे समजत नसेल तर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे तो अर्ज द्यावा. त्यात पत्ता वगैरे द्या. पीएनजी कनेक्शनची व्यवस्था असल्याने तुम्ही अर्ज केलेला आहे आणि तरीदेखील तुम्हाला पीएनजी कनेक्शन न मिळाल्यास तुमचा एलपीजी पुरवठा बंद होणार नाही. तुम्ही पीएनजीसाठी अर्ज केलेला असल्याने तुम्हाला मिळणारा एलपीजी बंद होणार नाही, असेही भुजबळ यांनी सांगितले. तसेच तुमच्या भागात पीएनजी कनेक्शनची सुविधा असूनही तुम्ही अर्जदेखील केला नसेल तर तुम्हाला मिळणारा एलपीजी बंद होऊ शकतो. जिथे पीएनजीचे काम सुरू आहे, त्याच भागासाठी हा नियम आहे. असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे.

# १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रमात महिला व बालविकास विभाग प्रथम

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांचा राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच गौरव करण्यात आला.




हा सेवाकर्मी उपक्रम राज्यातील शासकीय सेवांची प्रगती सर्वांगीणपणे मोजण्यासाठी तसेच पारदर्शक, कार्यक्षम आणि जबाबदार प्रशासनाला चालना देण्यासाठी राबविण्यात आला होता. या अंतर्गत विभागाच्या संघटनात्मक रचना, सेवाप्रवेश नियम, पदोन्नती व थेट भरती स्थिती, गोपनीय अहवालांचे व्यवस्थापन, अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया, ळत्रञ्जढ पोर्टलवरील प्रशिक्षण तसेच विभागीय चौकशी प्रकरणांच्या निपटाऱ्यासारख्या महत्त्वाच्या बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला.

तसेच 'सेवाकर्मी टेक' घटकाद्वारे तंत्रज्ञानाचा वापर आणि डिजिटल प्रशासनाची प्रगती तपासण्यात आली. यात पदोन्नती ट्रॅकिंग, 'डिजिटल महापर'द्वारे गोपनीय अहवालांचे डिजिटायझेशन, ळत्रञ्जढ प्रशिक्षण पूर्णता आणि ए-क्ठचड प्रणालीचा प्रभावी वापर यांचा समावेश होता. या मूल्यमापनात प्रथम क्रमांक मिळवणे हे महिला व बालविकास विभागाच्या सक्षम प्रशासन पद्धती, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि उत्कृष्ट सेवा देण्याच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे प्रतीक आहे. या यशाबद्दल महिला व बालविकास विभागाच्या टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, महाराष्ट्रातील नागरिकांसाठी अधिक पारदर्शक, प्रतिसादक्षम आणि नागरिक-केंद्रित प्रशासन बळकट होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

# लोहरा येथील श्री तपेश्वर भगवंताच्या नवसाच्या गाड्या ओढणे व यात्रा महोत्सव

**मानवत । प्रतिनिधी**

तालुक्यातील लोहरा येथे प्राचीन व मानवत तालुक्याचे वैभव असलेले श्री तपेश्वर महादेवाचे सुंदर अशा कलाकृतीने नटलेले मंदिर आहे. आतील,बाहेरील व चहूबाजूंनी कोरलेल्या सुबक मूर्ती काम येणाऱ्या सर्व भाविकांचे लक्ष वेधून घेतात. दरवर्षी अमली बारस निमित्ताने श्री तपेश्वर महादेव मंदिर परिसरात मोठी यात्रा भरते तसेच नवसाच्या गाड्या ओढण्यात येतात. श्री भागत कथेचे वाचन भागवतकार

ह.भ.प. श्री जनार्दन महाराज खडकवाडीकर हे होते. कथेचा प्रारंभ २४ मार्च रोजी झाला असून दररोज भागवत कथा दुपारी २ ते ५ यावेत संपन्न होत असे.३१ मार्च २०२६ रोजी भागवत कथा सप्ताहाची सांगता, नवसाच्या गाड्या ओढण्याचा

कार्यक्रम व यात्रा मोहत्सव संपन्न



होणार आहे. ह.भ.प. श्री मुंजाभाऊ महाराज ठाकुरबुवा लोहरेकर यांचे ३१ मार्च रोजी दुपारी ११ ते ०२ वाजता काल्याचे कीर्तन संपन्न होणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा. लोहरा येथील श्री तपेश्वर महादेव मंदिर संस्थान च्या वतीने कळविण्यात आले.

# धार्मिक कार्यक्रमांसाठी गॅस मागितल्याने लोढा निशाण्यावर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जैन बांधवांच्या उत्सवासाठी मलबार हिलमधील १६ जैन मंदिरांना प्रत्येकी पाच गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्याची विनंती करणारे पत्र राज्य सरकारला पाठवल्यामुळे वादंग निर्माण झाला होता. यावरुन विरोधकांनी लोढा यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. मंगलप्रभात लोढा संपूर्ण राज्याचे मंत्री असताना फक्त एका धर्मासाठी अशी मागणी कशी करु शकतात, असा सवालही विरोधकांनी उपस्थित केला होता. या पार्श्वभूमीवर आता मंगलप्रभात लोढा यांनी एक व्हिडीओ शेअर करत आपली बाजू मांडली आहे.



हिंदू सणाच्यावेळी आणि धार्मिक कार्यक्रमांवेळी टीका करायची ही एक फॅशन झाली आहे. माझ्यावर झालेली टीका त्याच नरेटिव्हचा भाग असल्याचे मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले. माझ्या मतदारसंघात रामनवमी, साई भंडारा, जैन धर्माचा कार्यक्रम हे विशेष धार्मिक कार्यक्रम आहे. त्यासाठी गॅसचा साठा नव्हता तर विशेष प्रयत्न करणे गरजेचे होते. माझ्याकडे साई भंडाऱ्याचे लोक आले होते, जैन धर्मीय लोक आले होते. मग त्यांना गॅस सिलेंडर मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायचा नाही का? मी त्यासाठी प्रयत्न केला तर काही चुकले का? २ तारखेला हनुमान जयंती आहे, १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. त्यासाठी विशेष धार्मिक कार्यक्रम असल्याने मला प्रयत्न करावा लागणारच आहे. माझी आमदार म्हणून ती जबाबदारी आहे. त्यामध्ये कोणाला गैर वाटत असेल किंवा कोणाला वाद निर्माण करायचा असेल तर त्याने करावा. मी जबाबदारीपासून पळ काढणार नाही. राज्यात गॅसचा तुटवडा नाही, राज्य सरकार चांगलं काम करत आहे. फक्त विशेष धार्मिक कार्यक्रमांच्यावेळी गॅस सिलेंडर मिळवायला प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे तेढ निर्माण करणे सोडा, असे मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले. मंगलप्रभात लोढा यांच्या या पत्रावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं आक्षेप घेतला. मनसेनं थेट गॅस पुरवठा करणाऱ्या एजन्सींना पत्र लिहून सर्वसामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रासाचा मुद्दा उपस्थित केला. तसंच एका विशिष्ट समाजासाठी दबाव टाकण्यात येत असल्याचा आरोप करून, गॅसचा काळाबाजार झाल्यास कठोर भूमिका घेण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# अवैध धंदे बंद करण्याची लेखी मागणी करूनही अवैध धंदे बंद होईना

**सोयगाव । प्रतिनिधी**

आमखेडा परिसरात सुरू असलेले अवैध धंदे बंद करण्यात यावे यासाठी आमखेडा ग्रामपंचायत ने ठराव घेऊन दि. १६ मार्च रोजी सोयगाव पोलीस ठाण्यात ठरावासह लेखी निवेदन देऊनही पोलिस प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नसल्याने संतप्त ग्रामपंचायत सदस्यांनी पुन्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक, तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार सोयगाव व सोयगाव पोलिस ठाण्यात दि.२३ मार्च रोजी दिलेल्या लेखी निवेदनात बेमुदत उपोषणाचा इशारा दिल्याने सोयगाव पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

आमखेडा गाव हे सोयगाव शहरालगत असल्यामुळे या बेकायदेशीर अवैध धंद्याचा विस्तार अधिक वेगाने होत आहे.या अवैध धंद्यांमुळे अनेक कुटुंबांचे संसार उध्वस्त होत असून आर्थिक व सामाजिक परिस्थिती गंभीर स्वरूप धारण करीत आहे. विशेष म्हणजे विद्यार्थी सुध्दा या गैरप्रवृत्तीच्या विळख्यात अडकला असून त्याच्या भविष्यावर मोठा परिणाम होत आहे .गावातील शांतता, कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. या संदर्भात आम्ही अनेक वेळा स्थानिक व प्रादेशिक वर्तमानपत्रांमध्ये बातम्या प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.तसेज दि.१६ मार्च रोजी ग्रामपंचायत मार्फत पोलीस ठाणे सोयगाव येथे लेखी निवेदन देण्यात आले होते.तथापि आज पर्यंत कोणतीही ठोस व परिणामकारक कारवाई करण्यात आलेली नाही ही अत्यंत खेदजनक बाब आहे.स्थानिकांमध्ये असा ठाम समज निर्माण झाला आहे की काही पोलिस कर्मचारी यांच्या आर्थिक संगनमतामुळे हे अवैध धंदे निर्भय पणे सुरू आहेत.त्यामुळे समाजाचा व नागरिकांचा पोलिस प्रशासनावरील विश्वास डळमळीत होत आहे.म्हणून आपणास विनंती नसून ठाम मागणी करण्यात येते की, आमखेडा परिसरातील सर्व अवैध पत्त्यांच्या जुगाराचे अड्ड्यांवर तत्काळ छापे




टाकून ते कायमस्वरूपी बंद करण्यात यावेत व संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. या प्रकरणात संबंधित पोलिस यंत्रणेची भूमिका देखील चौकशी अंती स्पष्ट करण्यात यावी.जर पुढील सात दिवसांच्या आत ठोस कारवाई झाली नाही तर दि.०३ एप्रिल रोजी तहसील कार्यालय सोयगाव येथे बेमुदत उपोषण करणार असल्याचे ग्रामपंचायत सदस्य अनिल नारायण ठाकरे व बाळू हेमराज बेदवे यांनी ग्रामीण पोलीस निरीक्षक छत्रपती संभाजीनगर, तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार सोयगाव व सोयगाव पोलिस ठाण्यात दि.२३ मार्च रोजी दिलेल्या लेखी निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आमखेडा परिसरात सुरू असलेले अवैध धंद्यांवर कोण कारवाई करणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## संक्षिप्त

### अंधारेंचा केसरकरांवर थेट हल्ला; ३९ नावं उघडा असं खुले आव्हान

**मुंबई । प्रतिनिधी**

आज पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी अशोक खरात प्रकरणात पत्रकार परिषद घेतली आहे. या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी आजही काही फोटो दाखवले आहेत. या फोटोवरून त्यांनी शिवसेना शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांना काही सवाल केले आहेत? जेव्हा केसरकर म्हणतात माझ्याविरोधात कट कारस्थान आहे, तेव्हा मला हा गंभीर आरोप वाटत नाही, तर हे अतिशय बालिश आणि हास्यास्पद वाटतं. दुसरा मुद्दा असा की, दीपक केसरकर म्हणतात ३९ लोक गेले, मग मला एकट्यालाच का टार्गेट करत आहेत? याचा अर्थच असा होतो की केसरकर स्वत: मान्य करतात की होय मी अशोक खरातकडे गेलो होतो, मी त्याच्या संपर्कात होतो, असं अंधारे यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना त्या म्हणाले की, केसरकर म्हणाले माझी चौकशी का करायची? नाहीतर मी सर्वांचा भांडाफोड करेल. मी या पत्रकार परिषदेमध्ये आव्हान करते की केसरकर एकदा भांड फोडाच. जे काही ३९ नावं आहेत ना ती एकदा सांगून टाकाच, असं आव्हानही त्यांनी यावेळी केसरकर यांना केलं आहे.

दरम्यान आज पुन्हा एकदा सुषमा अंधारे यांनी काही फोटो दाखवले आहेत. हे फोटो दाखवताना त्या म्हणाल्या की, मी काल काही फोटो दाखवले होते. ते फोटो दाखवताना असं म्हटलं होतं की, हा एमआयडीसीमधील गेस्टहाऊसमधील फोटो आहे. हा फोटो मी दोन दिवसांपूर्वी देखील दाखवला होता. या फोटमध्ये एक पिवळा शर्ट घातलेला माणूस दिसून येतो, तो माणूस प्रत्येक फोटोमध्ये दिसून येतो. पण हा माणूस दीपक केसरकरांसोबत काय करतो? याचं उत्तर केसरकरांनी दिलं पाहिजे. हा माणूस एक -दोन ठिकाणी नाही तर अनेक ठिकाणी केसरकरांसोबत दिसून येतो. एवढंच नाही तर मी चाकणकरांचा एक व्हिडीओ शेअर केला होता, ज्यामध्ये चाकणकर या खरातची पाद्यपूजा करत होत्या, त्यावेळी देखील हा माणूस खरातसोबत होता. मग हा माणूस कोण आहे? हा माणूस सरखा-सारखा का दिसतो? या मानसाने चाकणकरांचा देखील सत्कार केला होता.

तर या माणसाचं नाव आहे, नामकर्ण एकनाथ आवारे, कोण आहे नामकर्ण एकनाथ आवारे तर जी माहिती मिळते, त्या माहितीनुसार हा जगदंब पतसंस्थेचा प्रमुख आहे. मग जगदंब पतसंस्थेचा प्रमुख दीपक केसरकरांसोबत काय करत होता? मी हे समजू शकते की अशोक खरातला तुम्ही गुरू मानलं असेल, मग तुम्ही ज्यांना गुरू मानलं त्या व्यक्तीसोबत तुम्ही मंदिरात दिसणं मी समजू शकते, त्याच्या पाया पडणंही मी समजू शकते, पण तो नामकर्ण एकनाथ आवारे अशोक खरातसोबत काय करतोय? हा व्यक्ती प्रत्येक ठिकाणी आहे. हा माणूस अजूनही रेकॉर्डवर आलेला नाहीये, आजच्या पत्रकार परिषदेमध्ये मी या माणसाला रेकॉर्डवर आणतीये, असं यावेळी अंधारे यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की मी यावर आज का बोलतीये? तर मी जेव्हा या आवारेची माहिती घेतली, तेव्हा लोक दबक्या आवाजात बोलतात, की अनेक बड्या नेत्याचे अधिकाऱ्यांचे ब्लॅक मनी व्हाईट करण्याचं काम हा आवारे जगदंब पतसंस्थेमार्फत करत होता, असा आरोपही यावेळी आंधारे यांनी केला आहे. आता हे खरं की खोटं? ते पोलिसांनी तपासावं पण याला रेकॉर्डवर आणणं गरजेचं होतं. जो माणूस ब्लॅक पैसे व्हाईट करण्याचं काम करतो, तो केसरकरांसोबत काय करतोय? या माणसासोबत केसरकर सारखे -सारखे दिसत आहेत, आवारे आणि खरातसोबत तुम्ही नेमकं कोणत्या आर्थिक व्यवहारांवर बोलत आहात? याचं उत्तर केसरकरांनी दिलं पाहिजे, असं यावेळी अंधारे यांनी म्हटलं आहे.

# जालना महानगरपालिकेच्या विशेष सभेत नगरसेविका ॲड. रीमा खरात यांचा प्रशासनावर हल्लाबोल

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेत दि. ३० मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विशेष सभेत प्रभाग क्र. १४ च्या नगरसेविका ॲड. रीमा संदीप खरात यांनी प्रशासनावर विविध प्रश्नांवरून जोरदार टीका केली. शहरातील प्रलंबित कामे, निधीचे नियोजन आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवर त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

सभेत बोलताना खरात यांनी मोती तलावातील तथागत गौतम बुध्द यांचा पुतळ्याच्या स्थापनेचा मुद्दा उपस्थित केला. गेल्या १५ वर्षांपासून आंबेडकरी समाजाकडून या पुतळ्याची मागणी होत असूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असे त्यांनी सांगितले. यासंदर्भात महापालिकेच्या अर्थसंकल्पात कोणतीही निधीची तरतूद करण्यात आलेली नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच या विषयावर येत्या ६ तारखेला होणार्या सर्वसाधारण सभेत आयुक्तांकडून खुलासा मागवण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.





याशिवाय दिव्यांग कल्याण योजना, रुग्ण सुधार योजना, मागासवर्गीय कल्याण, महिला व बालकल्याण तसेच समाज कल्याण विकास योजनांसाठी अर्थसंकल्पात प्रत्येकी १.५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असली तरी ती अपुरी असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनांसाठी निधी वाढविण्याची मागणी त्यांनी केली.

महापालिकेच्या मालकीच्या जागांचा विषय उपस्थित करताना त्यांनी सांगितले की, या जागा मनपासाठी उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन असताना त्याची भ्रष्ट पद्धतीने विल्हेवाट लावली जात आहे. संबंधित जागांबाबत किती न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत?, त्यासाठी नियुक्त वकील कोण आहेत? आणि सध्याची स्थिती काय आहे?, याची माहिती मागितली असता प्रशासनाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही, अशी टीका त्यांनी केली.

तसेच भ्रष्ट अधिकार्यांवर तात्काळ कारवाई करून त्यांची बदली करण्यात यावी, अशी मागणीही खरात यांनी यावेळी केली. या सभेत नगरसेवक व अधिकार्यांमध्ये विविध मुद्द्यांवर चर्चा रंगली असून प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

## डॉ. कैलाश सचदेव यांची IMA महाराष्ट्र राज्याच्या रक्तदान समितीच्या सह-अध्यक्षपदी नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) महाराष्ट्र राज्याच्या वतीने जालना येथील प्रख्यात वैद्यकीय तज्ञ डॉ. कैलाश सचदेव यांची रक्तदान समितीच्या सह-अध्यक्ष (Co-Chairman) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. खच-महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांनी ही नियुक्ती जाहीर केली.

या समितीमध्ये पदसिद्ध सदस्य म्हणून अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी आणि मानद राज्य सचिव डॉ. विक्रांत देसाई यांचा समावेश आहे. राज्यभर रक्तदान चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी आणि वैद्यकीय क्षेत्रातील सदस्यांच्या हितासाठी ही समिती कार्य करत आहे.

सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग

डॉ. कैलाश सचदेव हे केवळ वैद्यकीय क्षेत्रापुरते मर्यादित नसून




सामाजिक कार्यातही ते सातत्याने सक्रिय आहेत. विविध आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहिमा, गरजू रुग्णांना मदत तसेच आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवा देण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. समाजाच्या आरोग्यविषयक उन्नतीसाठी त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.

रक्तदान चळवळीत महत्त्वाची भूमिका

रक्तदान हे जीवनदान आहे, या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी डॉ. सचदेव यांनी अनेक रक्तदान शिबिरांचे आयोजन केले आहे. युवकांमध्ये रक्तदानाविषयी जागरूकता निर्माण करणे, नियमित रक्तदात्यांचा समूह तयार करणे आणि आपत्कालीन रक्तपुरवठा सुनिश्चित करणे यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे.

तसेच वाढदिवस, विवाह वार्षिक (ॲनिव्हर्सरी) किंवा पुण्यस्मरण यांसारख्या विशेष दिवसांच्या निमित्ताने सर्वांनी रक्तदान करावे, असे आवाहन डॉ. कैलाश सचदेव यांनी केले आहे. रक्तदान केल्याने शरीरातील रक्त कमी होत नाही, उलट नवीन रक्तनिर्मितीला चालना मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. कैलाश सचदेव यांच्या या नियुक्तीबद्दल वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'महात्मा फुले नगर' येथे जयंती मंडळाची निवड



**वसमत । प्रतिनिधी**

वसमत: प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून, शहरातील त्रिरत्न बुद्ध विहार, महात्मा फुले नगर येथे एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शिवराम गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत जयंती उत्सवाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाची' नवीन कार्यकारिणी सर्वानुमते गठीत करण्यात आली. मंडळाच्या अध्यक्षपदी सोनू देविदास सूर्यवंशी यांची निवड झाली आहे. इतर पदाधिकारी खालीलप्रमाणे आहेत:

उपाध्यक्ष: बाबुराव कांबळे सचिव: विशाल आळणे व अमोल खिल्लारे कोषाध्यक्ष: राजेंद्र अवचार प्रसिद्धी प्रमुख: अनिल पंडित सल्लागार: रमेशभाई भुजबळे, प्रल्हाद लांडगे, नामदेव इंगोले, ड. दिलीप जाधव आणि विनोद गायकवाड. मिलिद आळणे या बैठकीस महात्मा फुले नगरातील युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती निमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

## पतीच्या संशयातून पत्नीचा जीव गेला

**मुंबई । प्रतिनिधी**

चारित्र्याच्या संशयातून एका २६ वर्षीय पतीने आपल्या २२ वर्षीय पत्नीची अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना विरारमध्ये उघडकीस आली आहे. वज्रेश्वरी जवळील शिरवली गावच्या शिवारात एका महिलेचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह सापडल्यानंतर, विरार गुन्हे शाखा कक्ष-३ ने तपास करत पती आणि त्याच्या एका साथीदाराला अटक केली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, २१ मार्च रोजी शिरवली गावाजवळील एका निर्जन शेतात २५ ते ३० वयोगटातील एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आला होता. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने तिची ओळख पटवणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. गुन्हे शाखेने तातडीने तपासाची चक्रे फिरवली आणि परिसरातील शेकडो सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपी रोशन यादव (२६) आणि



त्याचा मित्र भानुप्रताप यादव (३०) यांना ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी आपला गुन्हा कबूल केला. मृत महिलेचे नाव मधुबाला उर्फ प्रियाकुमारी यादव (२२) असून ती मुख्य आरोपी रोशन यादव याची पत्नी होती. रोशनला पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता, ज्यातून त्यांच्यात सतत वाद होत असत. १९ मार्च रोजी रोशनने आपला मित्र भानुप्रताप याच्या मदतीने मधुबालाला फिरवण्याच्या बहाण्याने वज्रेश्वरी येथील दुर्गम भागात नेले. त्यानंतर दोघांनी मिळून मधुबालावर धारदार शस्त्राने वार केले. त्यानंतर तिची ओळख पटू नये म्हणून दगडाने तोंड ठेचून तिची हत्या केली व मृतदेह तिथेच टाकून पसार झाले.

## रस्त्यात अडवून लुटमार आणि अत्याचार; फ्रेजरपुरा हद्दीत संतापजनक घटना

**अमरावती । प्रतिनिधी**

अमरावतीत फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भानखेडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक धक्कादायक प्रकार घडला आहे. यात जंगल परिसरात एका तरुणी व तिच्या मित्राला अडवून मारहाण करत लुटमार केल्याची घटना घडलीय. सोबतच तरुणीवर जबरदस्ती अत्याचार केल्याचीही संतापजनक घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळं गाठत पुढील पक्रिया केलीय. तपासाअंती या प्रकरणी गुन्हा दाखल करत या गंभीर गुन्ह्यातील पाच आरोपींना ताब्यात घेतलेय. या प्रकरणाचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत असून घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि तिचा मित्र ॲक्टिव्हा वाहनाने जात असताना अज्ञात पाच इसमांनी त्यांना अडवले. आरोपींनी दोघांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून त्यांच्या जवळील रोख रक्कम हिसकावून घेतली. त्यानंतर एका आरोपीने तरुणीला बाजूला नेत तिच्यावर जबरदस्ती अत्याचार केला.

सध्या पीडित तरुणीवर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणी घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा दाखल करत या गंभीर गुन्ह्यातील पाच आरोपींना ताब्यात घेतलेय. या प्रकरणाचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत असून घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याने पीडिता, साक्षीदार तसेच आरोपींबाबतची माहिती पोलिसांकडून अधिकृतरीत्या जाहीर होईपर्यंत प्रसारित करू नये, अन्यथा संबंधितांवर प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# जालना शहरातील वाल्मीक नगर ख्रिस्ती कम्प येथे नगरसेवकासह सहा ते सात जणांवर हल्ला

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक ३० सोमवार रोजी रात्री पावणे एक वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरात पालम संडे निमित्त आयोजित कार्यक्रमात घुसखोरी झाल्यानंतर वाद होऊन मारहाणीची घटना घडली आहे. या घटनेत नगरसेवकासह सहा ते सात जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

ख्रिस्ती धर्मातील ४० दिवसांच्या उपवासाची सांगता निमित्त दि.२९ रविवार रोजी पालम संडे साजरा करण्यात येत होता.

या पार्श्वभूमीवर जालना शहरातील वाल्मीक नगर ख्रिस्ती कॅम्प येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सार्वजनिक जेवणाचा कार्यक्रमही ठेवण्यात आला होता.

मात्र, कार्यक्रमादरम्यान इतर परिसरातील काही तरुणांनी शिरकाव केल्याने वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर भांडणात होऊन उपस्थितांवर मारहाण करण्यात आली. या घटनेत प्रभाग क्रमांक ४ चे नगरसेवक संजय पाखरे, संदीप भालेराव, संजय हिरे, आदेश गायकवाड, अभिजीत कसबे यांच्यासह दोन ते तीन जण जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना शासकीय





रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. दरम्यान, ही बातमी शहरात वेगाने पसरल्यानंतर घाटी रुग्णालयात ख्रिस्ती समाज बांधवांची मोठी गर्दी झाली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी कदीम जालना पोलिसांनी तत्काळ रुग्णालयात धाव घेत जमाव पांगवला. पोलीस हल्लेखोरांच्या शोध घेत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**